लोकमत दि. २१/९/२०१३

# नाशिक महानगरपालिका, नाशिक.

## स्थानिक संस्था कर विभाग

## (Local Body Tax Department)

### जाहीर आवाहन

नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व व्यापार, व्यवसाय, उद्योग करणाऱ्या व इतर सोई-सुविधा पुरविणाऱ्या तमाम व्यक्ती, खाजगी, शासकीय, निमशासकीय संस्था व आस्थापना, महामंडळे, बांधकाम व्यावसायिक, कॉन्ट्रॅक्टर इत्यादि यांना कळविण्यात येते की,

- नाशिक महानगरपालिकेच्या **www.nashikcorporation.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्थानिक संस्था कर डिमड् रजिस्टरधारकांपैकी ज्यांनी अद्यापपावेतो त्यांची संपूर्ण माहिती व विहित नमुन्यातील अर्ज नाशिक महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही त्यांनी तीन दिवसांचे आत अर्ज सादर करावेत. मुदतीत नोंदणी अर्ज सादर न केल्यास अशा स्थानिक संस्था करधारकांविरुद्ध नोंदणी केली नसल्याचे गृहित धरुन पुढील दंडात्मक कारवाई करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितावर राहील याची नोंद घ्यावी.
- महाराष्ट्र स्थानिक संस्था कर नियमातील तरतुदीनुसार प्रत्येक महिन्याच्या १ ते २० तारखेपर्यंत स्थानिक संस्था कराचा भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार मुदतीत पैसे भरुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.
- जे स्थांनिक संस्था कर नोंदणीधारक मुदतीत स्थानिक संस्था कराचा भरणा करणार नाही त्यांचेविरुद्ध नियमातील तरतुदीनुसार ते थकबाकीदार आहेत असे गृहित धरुन त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८ नुसार जप्तीची कारवाई केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.
- ज्या व्यापारी / व्यावसायिक / उद्योजक यांनी स्थानिक संस्था कराचे नोंदणी अर्ज सादर केले आहे व ज्यांना स्थानिक संस्था कराचे नंबर प्रदान करण्यात आलेले आहे अशा नोंदणीधारकांची नोंदणी प्रमाणपत्रे तयार झालेली असून त्यांनी मुख्य कार्यालयात संपर्क साधून नियमानुसार नोंदणी फी भरून प्रमाणपत्र घेऊन जाणेचे करावे.

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

ज.स.जा.क्र./वशि/१७८/२०१३-१४,
दि.२०.९.१३